# University of Mumbai

परीक्षा विभाग
अभियांत्रिकी निकाल कक्ष,
महात्मा जोतीराव फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पुर्व)
मुंबई – ४०० ०९८

क्र.परीक्षा/अभियांत्रिकी निकाल कक्ष/ ४६ /२०१८

संदर्भ : परीक्षा विभागाचे क्रमांक परीक्षा/अभियांत्रिकी निकाल कक्ष/४३/२०१८,
दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजीचे परिपत्रक

परपित्रक:–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक यांना सुचित करण्यात येते की, मे, २०१८ (प्रथम सत्र २०१८) मध्ये घेण्यात येणा–या अभियांत्रिकी पदवी परीक्षेचे प्रवेश अर्ज दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजीपर्यत स्विकारण्यात येणार होते. काही अपरिहार्य कारणांमुळे खालील नमुद केलेल्या शिक्षणक्रमाच्या परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in या वेब लिंक वरुन आता online खालील तारखांप्रमाणे घेण्यात येणार आहे.

1) F.E. (Sem.I) (CBSGS/CBCGS)
2) F.E. (Sem.II) (CBSGS/CBCGS)
3) B.E. (Sem. VII) (CBSGS)
4) B.E. (Sem. VIII) (CBSGS)

वरील अभ्यासक्रमाचे परीक्षा प्रवेश अर्ज उपरोक्त वेब लिंक वरुन Online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:–

| अ.क्र. | परीक्षा शुल्क | Online अर्ज भरण्याची व Inward करण्याच्या तारखा | Form submission Report व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखां |
|---|---|---|---|
| ०१ | नियमित शुल्क | २३/०४/२०१८ पर्यत | २५/०४/२०१८ पर्यत |

वर नमुद केलेल्या तारखांचा तपशीलाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील वरील नमूद केलेल्या परीक्षांसाठी प्रविष्ठ होण्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रवेश अर्ज उपरोक्त वेब लिंक वर Online भरुन ते आपल्या महाविद्यालयाच्या Login मध्ये Inward करुन घ्यावेत व सदर inward झालेल्या परीक्षा प्रवेश अर्जाची व Form submission Report ची प्रिंटस काढून, परीक्षा अर्जासोबत विद्यार्थ्यांचे मागिल सत्राचे /परीक्षांचे गुणपत्रिकांच्या छायांकित (गुणपत्रिका संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यानी साक्षांकित केलेल्या असणे आवश्यक आहे.) प्रती जोडून हे अर्ज, Form submission Report ची प्रिंट व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावी. **पोस्टाने अथवा कुरिअरने स्विकारले जाणार नाहीत.**

परीक्षा अर्ज विद्यापीठात जमा करताना हया अर्जाचे सत्र निहाय, पॅटन निहाय (Credit Based/Choice Based) शाखा निहाय असे गठ्ठे बांधुनच विद्यापीठात जमा करावे, जेणेकरुन हया अर्जाची छाणणी करणे सुलभ होईल.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता २३/०४/२०१८ रोजी सायं ६ वा) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत **कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाही या बाबींची नोंद घेण्यात यावी.**

.......२/

# University of Mumbai



परीक्षा प्रवेश अर्ज Inward झाल्यानंतर यामध्ये कोणतीही दुरुस्ती करता येणार नाही. यामुळे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्याचे नांव (इंग्रजी व मराठी या दोन्ही लिपीत) विषय व इतर सर्व माहिती अचूक व बरोबर याची खात्री करुन घ्यावी.

जे विद्यार्थी नोव्हेंबर २०१८ च्या परीक्षेस प्रविष्ठ होउन अनुत्तीर्ण असतील व त्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल अश्या विद्यार्थ्याचे प्रथम सत्र २०१८ मध्ये होणा–या या परीक्षांसाठीचे परीक्षा प्रवेश अर्ज (Provisional Basis) त्यांच्या पुर्नमुल्यांकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता उपरोक्त विहित कालावधीत सादर करावेत.

तसेच पुढे आपणांस असेही कळविण्यात येते की, B.E. (Sem VII & VIII) या सत्रासाठी प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्याचे परीक्षा प्रवेश अर्ज भरताना विद्यापीठ Ordinance ३७२९ व ३७३१या मधील नमुद असलेल्या तरतुदीचे तंतोतंत पालन करावे. या Ordinance मधील तरतुदीचाा उल्लघंन झाल्यास व यामुळे भविष्यात काही कायदेशीर/न्यायालयीन बाबी उदभवल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची असेल यांची नोद घ्यावी.

(Web Link :- mu.ac.in → exams & results → examination →Exam forms (All Exam) → follow the instructions given on the page)

स्थळ : मुंबई
दिनांक :– १८ एप्रिल, २०१८

स्था. संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व अभियांत्रिकीच्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/ संचालक

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेशित
१. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभाग
३. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

ब. प्रत माहितीसाठी अग्रशित
१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ
२. उपकुलसचिव, नावनोंदणी व पात्रता विभाग
३. मा. कुलगुरु यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
४. मा. प्र.कुलगुरु, कुलसचिव, संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, व वित्त व लेखा अधिकारी यांचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.

स्था. संचालक करिता 18/4/18
परीक्षा व मुल्यमापन मंडळ